राज्यातील टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची विद्यापीठे व परीक्षा मंडळे यांची परीक्षा फी माफ करण्याची योजना

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. एफईडी १५९२/१२०२/[११३२]/माशि-५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १८ ऑक्टोबर, १९९३.

(12)

**-: शासन निर्णय :-**

राज्यातील काही भागात गेली काही वर्षे सतत अवर्षण परिस्थिती निर्माण झाली होती. ज्या ज्या वेळी अशा अवर्षणाची परिस्थिती निर्माण झाली त्या त्या वेळी अवर्षणग्रस्त परिस्थितीचे निवारण करण्यासाठी शासनाने काही योजना कार्यान्वित केल्या होत्या. त्यापैकी शिक्षण विभागाचे संबंधित टंचाईग्रस्त भागातील इ. बी. सी. धारक विद्यार्थ्यांना "विद्यापीठे व परीक्षा मंडळे यांच्या परीक्षा फी माफीची सवलत" ही योजना तदर्थ स्वरूपात कार्यान्वित करण्यात आली होती. याकरिता लागणारा निधी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून उपलब्ध करण्यात येत असे. तथापि, अवर्षणाची परिस्थिती ही जवळ जवळ प्रतिवर्षी निर्माण होणारी बाब असल्याने, याबाबत एक नियमित स्वरूपाची योजना कार्यान्वित करावी असा निर्णय शासनाने घेतला असून, त्यानुसार १९९२-९३ च्या आर्थिक वर्षापासून, यापुढे ज्यावेळी किंवा ज्या वर्षी अवर्षणाची परिस्थिती राज्यातील ज्या भागात उद्भवेल (त्यासंबंधित टंचाईग्रस्त भागातील गरजू विद्यार्थ्यांना या योजनेखाली विद्यापीठे व परीक्षा मंडळे यांनी ठरविलेल्या परीक्षा फी माफीच्या सवलतीचा लाभ देण्यास शासन मंजुरी देत आहे.)

टंचाईग्रस्त भागातील गरजू विद्यार्थ्यांना विद्यापीठे व परीक्षा मंडळे यांनी निश्चित केलेल्या परीक्षा फी च्या लाभाबद्दल खालीलप्रमाणे योजना मंजूर करण्यात येत आहे :-

[अ] योजनेचे स्वरूप :-

प्रतिवर्षी राज्यातील सर्व भागात खरीप हंगामातील व रब्बी हंगामातील पिकांची पैसेवारी ठरविण्यात येते. त्यावेळी ज्या गावाची अंतिम पैसेवारी ५० पेक्षा कमी असते ती, गावे टंचाईग्रस्त म्हणून जाहीर केली जातात. महसूल विभागाकडून विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करून पिकांची गाववार अंतिम पैसेवारी जाहीर होते. या गावातील नावे संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे उपलब्ध असतात. / या गावातील

[१] ई.बी.सी. योजनेचा लाभ घेणा-या विद्यार्थ्यांना व [२] इ.१२ वी पर्यंत मुलींना मोफत शिक्षण या योजनेचा लाभ घेणा-या सर्व मुलींना ही योजना लागू राहील.

[ब] <u>व्याप्ती:-</u>

ही योजना खाली नमूद केलेल्या परीक्षा मंडळांच्या व राज्यातील सर्व विद्यापीठांच्या परीक्षेस बसणा-या विद्यार्थ्यांना लागू राहील :-

[१] महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
[ इ. १० वी व १२ वी परीक्षा ]

[२] तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ.

[३] व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ.

[४] कला संचालनालय परीक्षा मंडळ.

[५] शासकीय परीक्षा व त्याची डी.एड. परीक्षा.

[६] व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील व केंद्र शासनाकडून घेतल्या गेलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी घेतलेल्या व्यवसाय परीक्षा.

[७] कृषी व कृषीतर विद्यापीठांच्या परीक्षा :.
[ मुक्त विद्यापीठ वगळून ]

[क] ही सवलत खालील विद्यार्थ्यांना लागू असणार नाही :-

[१] ज्या विद्यार्थ्यांना शासनाच्या अन्य शैक्षणिक सवलती योजनेनुसार परीक्षा फी माफीची सवलत उपलब्ध आहे. [उदा. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना फी माफीची सवलत, माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पाल्यांना माध्यमिक स्तरावर फी माफीची सवलत, प्राथमिक शिक्षकांच्या पाल्यांना फी माफीची सवलत.]

[२] जे विद्यार्थी त्याच परीक्षेस दुस-यांदा बसले असतील. [रिपिटर]

[३] जे विद्यार्थी बहि:स्थ [एक्सटर्नल] म्हणून नोंदले असतील.

[४] ज्या विद्यार्थ्यांचे पालक शहरात प्रत्यक्ष राहातात, नोकरी धंदा करतात, परंतु त्यांचे नांवे गावी शेतजमीन आहे असे विद्यार्थी.

[ड] योजनेची अंमलबजावणी खालीलप्रमाणे करण्यात यावी :-

[१] अंतिम पैसेवारीनुसार अवर्षणग्रस्त म्हणून जाहिर होणा-या गावांची नावे संबंधित जिल्हा शिक्षणाधिका-याने आपापल्या जिल्हाधिका-यांकडून तात्काळ प्राप्त करुन घ्यावी व ती सूची

....3

जिल्ह्यांतील सर्व शिक्षण संस्थांच्या [शाळा व महाविद्यालये ] निदर्शनास योग्यप्रकारे तात्काळ आणावी.

२] त्यानंतर टंचाईग्रस्त भागातील सवलतीस पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांनी परीक्षा फी माफीच्या सवलतीचा लाभ मिळावा म्हणून अर्ज शाळेच्या मुख्याध्यापकाकडे तात्काळ सादर करावेत.

३] इ.१० वी व १२ वी या परीक्षांसाठी अर्ज सादर करण्याची मुदत ही सर्वसाधारणपणे १ ऑक्टोबर अशी असते त्यामुळे या सवलतीस पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांनी भरलेल्या परीक्षा फीची प्रतिपूर्ती करावी लागेल. तेव्हा सवलतीस पात्र असणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांबाबतची माहिती शाळा/महाविद्यालयांच्या मुख्याध्यापकांनी फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात प्राप्त करुन घ्यावी.

४] फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज संबंधित जिल्हा शिक्षणाधिकारी [माध्य.] यांचेकडे मुख्याध्यापक/महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी न चुकता पाठवावे.

५] जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाची छाननी करुन एकत्रित प्रस्ताव २८/२९ फेब्रुवारीपर्यन्त आपल्या विभागाच्या विभागीय शिक्षण उपसंचालकांकडे न चुकता पाठवावा.

६] विभागीय शिक्षण उपसंचालकांनी १० मार्चपर्यन्त त्यांच्या जिल्ह्यातील प्रस्ताव तपासून देय असलेल्या रकमेचे देयक शासकीय कोषागारातून पारित करुन घ्यावे व दर्शनी हुंडीव्दारे [डिमांड ड्राफ्ट ] आवश्यक त्या रकमा संबंधित जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे सुपूर्द कराव्यात.

७] त्यानंतर जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांनी संबंधित शिक्षण संस्थामार्फत संबंधित विद्यार्थ्यांना परीक्षा फी ची रक्कम परत करावी व त्याचा अहवाल विभागीय शिक्षण उपसंचालकांकडे त्वरित पाठवावा.

८] ज्या परीक्षांच्याबाबत अर्ज सादर करण्याची मुदत ही डिसेंबर/जानेवारी अशी असेल [उदा. विद्यापीठाच्या परीक्षा ] त्यांचेबाबत खालील पध्दत अवलंबण्यात यावी :-

सवलतीस पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयाच्या/शिक्षण संस्थेच्या प्राचार्यांनी परीक्षा फी न घेता त्यांचे आवेदनपत्र विद्यापीठाकडे/परीक्षा मंडळाकडे खाली नमूद केलेल्या प्रमाणपत्रावर स्वाक्षांकित करुन पाठवावे. त्याच बरोबर या विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती विवरण पत्रासह तयार करुन परीक्षा फी चा विस्तृत तपशील देऊन त्यांची बिले तयार करुन शिक्षणाधिकाऱ्यांमार्फत विभागीय शिक्षण उपसंचालकांकडे सादर करण्यात यावीत.

.....४

—!



## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, वर यादीत दर्शविलेले परीक्षार्थी या महाविद्यालयात नियमित विद्यार्थी असून ते ------ या विद्यापीठाच्या मार्च १९ --- च्या परीक्षेला बसलेले आहेत. ते जे.सी.सी. धारक असून टंचाईग्रस्त गावातील रहिवासी आहेत म्हणून ते परीक्षा फीची प्रतिपूर्ती करण्यास पात्र आहेत.

विभागीय शिक्षण उपसंचालकांनी अशा विद्यार्थ्यांची माहिती प्राप्त झाल्यानंतर जे विद्यार्थी सवलतीस पात्र ठरत असतील त्यांच्या परीक्षा फी ची प्रतिपूर्ती करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या रकमेचे डिमांड ड्राफ्ट तयार करुन ते विद्यापीठाकडे/परीक्षा मंडळाकडे "प्रतिपूर्तीची रक्कम" म्हणून पाठवावेत.

या योजनेचे नियंत्रण अधिकारी म्हणून शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे काम पाहतील. या योजनेखाली होणारा खर्च "२२०२-सर्वसाधारण शिक्षण-८०, सर्वसाधारण ८०० इतर खर्च [सोला] [ए] अवर्षणग्रस्त खेड्यातील विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी/प्रतिपूर्ती करणे [२२०२ २५८८] मागणी क्र.--२, या शिर्षाखाली त्या त्या वर्षी मंजूर केलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा. हा शासन निर्णय महसूल व वन विभाग यांच्याशी विचार विनिमय करुन व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भासह सहमती प्राप्त करुन त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.प्र.क्र.१०३४/९३/व्यय-५, दि.२८.५.९३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ अ.श्री.पाटील ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षण संचालक, [उच्च शिक्षण], महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कला संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

.....५